१२५६३/८५

जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मान्यता-१४/पुणे/०६
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 1 4 JUN 2006

१२५५८/८७

प्रति,

...गाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत (माध्यम —मराठी)...

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक नप्राशा-१७०६/(१०२/०६)/प्राशि-३, दिनांक १६ मे, २००६

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व संपूर्ण पत्ता | प्रस्तावित शाळेचे ठिकाण | माध्य | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | कै.विठ्ठलराव बेलदरे पाटील ज्ञानप्रसारक संस्था, प्रा. विद्यालय, आंबेगांव बु., ता. हवेली, जि. पुणे | आंबेगांव बु., ता. हवेली, जि. पुणे | मराठी | १ ली |

कायम विनाअनुदानीत

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मा... काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेश समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेला ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे. त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरण साठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करून ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता.)

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१ करिता

UPC

20694-96

(14)

तात्काळ

कायम विनाअनुदान (मराठी माध्यम )

जा.क्र.शिऊसं/प्राशि-३/नखाप्राशा/पुवि-०८

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,

पुणे-१, यांचे कार्यालय.

दिनांक :

16 JUN 2008

प्रति,

सचिव,

कै.विठ्ठलराव बेलदरे पाटील ज्ञान प्रसारक संस्था,

प्रा.विदयालय,आंबेगांव बुं.ता.हवेली जि.पुणे.

विषय २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत . . .

संदर्भ :-१.शासन पत्र क्रमांक नप्राशा/१७०६/ ( ११४/२००६) ) प्राशि-३, दिनांक १६.५.२००६ व दिनांक ३१.५.२००६

२. या कार्यालयाचे पत्र क्रजा.क्र.प्रा/प्राशि-३/खाप्राशा/मान्यता पुवि/०६, दिनांक ७.६.२००६ व दिनांक १४.६.२००६

३. शासन पत्र क्रमांक नप्राशा /२००६(४५७/०६)दि.१८.७.२००६

४..या कार्यालयाचे पत्र क्रमांक शिऊसं/प्राशि -०१/पुवि /२००६ दिनांक २९.७.२००६

५.शासन पत्र क्रमांक न्यायाप्र/२००८/(१९२/०८) माशि-१, दि.१७.३.२००८

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे. असे उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक २ नुसार कळविण्यांत आले होते.

तथापी संदर्भ क्रमांक ३ नुसार शासनाने म.रा.शि.महामंडळ यांनी उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक २८९७/२००६ या याचिकेवर दिलेल्या निर्णयानुसार दिनांक १६.५.२००६ ते ३१.५.२००६ या कालावधीत दिलेले नविन प्राथमिक शाळा परवानगी आदेश रदद केले होते. त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक ४ अन्वये शाळा परवानगीचे आदेश रदद झाल्याचे संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांचे मार्फत आपणांस कळविण्यांत आले होते आता उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक ५ नुसार शासनाने दिनांक १६.५.२००६ ते ३१.५.२००६ या कालावधीतील परवानगी आदेश कायम राहतील असे कळविलेले आहे. त्यानुसार आपल्या शाळेस परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे. आपण परवानगी मिळालेल्या ठिकाणी शाळा सुरु केली नसल्यास शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ अन्वये आपणांस नुतनीकरणाने परवानगी शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून घेणेबाबत प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | कै.विठ्ठलराव बेलदरे पाटील ज्ञान प्रसारक संस्था, प्रा.विदयालय,आंबेगांव बुं.ता.हवेली जि.पुणे. | आंबेगांव बुं.ता.हवेली जि.पुणे | पहिली | मराठी |

कायम विनाअनुदान

शिक्षण प्रमुख, मनपाशिमं ,प्रशासन अधिकारी मनपा/नपाशिमं, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,यांना सदर संस्थेकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत समक्ष भेट देऊन विहित नमून्यातील स्वयंस्पष्ट शिफारशीसह आपला अहवाल १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यांत येत आहे..

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना शाळा परवानगी देणे/ न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करण्यांत येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक / माध्यमिक शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

मुख्याध्यापक
सन-ब्राईट प्राथमिक विद्यालय
आंबेगाव (बु.) पुणे-४६

६. संस्थेने विहित नमून्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.

७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

१०. सक्षम अधिका-यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विदयार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच आपला अभिप्राय सादर करावा.व त्याआधारेच शाळेची परवानगी दिली जाईल.

११. सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संबंधित संस्था उघडणार नाही. असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यांत आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही. याबाबत देखिल संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

१३. शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ नुसार पुढील शैक्षणिक वर्षात (२००८-०९) शाळा सुरु न केल्यास यानंतर नुतनीकरणाच्या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही. व सदर शाळांचे परवानगी आदेश रददबातल होतील याची नोंद घ्यावी.

१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.

१५. संस्थेंने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यांत यावी. (उदा:- नांव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही. सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १५ विहित अटींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसांचे आत आपल्या जिल्हाचे/मनपा/नपा चे शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा परिषद, शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ/ प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ यांचे कार्यालयास आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे. शाळा परवानगी दिलेल्या वर्षी शाळा सुरु केलेली नसल्यास सदर पत्र प्राप्त झाले पासून सात दिवसांचे आत शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा परिषद, शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ व या कार्यालयास लेखी कळवावे.

स्थळप्रतिवर शि. उ. स
यांची सही असे

(मा.बा.निकम)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१करिता.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी

१. शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,

३. प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ,

२/-आपण सदर संस्थेच्या मूळ प्रस्तावावरुन सविस्तर पत्त्यावर वरिल शाळा परवानगी देण्याचे विचाराधीन असल्याचे आपले स्तरावरुनही तात्काळ कळविण्यांत यावे. मूळ प्रस्तावित परवानगीचे ठिकाण व माध्यम याबाबत खात्री करावी व वरिल अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा. शाळा प्रत्यक्ष सुरु नसल्यास तसे लेखी स्वरुपात या कार्यालयास सादर करावे.

प्रत : १. मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.

२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर

मुख्याध्यापक
सन-ब्राईट प्राथमिक विद्यालय
आंबेगाव (बु.) पुणे-४६

**कायम विनाअनुदान तत्वावर**
**नूतनीकरणाने**

जाक्र.प्राशि-३/खाप्राशा/नू.मा./पुवि/०८-०९/2920-23
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 27 JAN 2009

प्रति
१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,पुणे

२) शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ

**विषय:** सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात परवानगी मिळालेल्या नविन खाजगी प्राथमिक शाळेस सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षापासून नुतनीकरणाने परवानगी देणेबाबत. . .

**संदर्भ:** १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक नप्राशा/१७०६/(११४/२००६)/प्राशि-३, दिनांक १६ मे २००४६
२. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र. नमाशा-२००७/(९८६/०७) दिनांक १९ ऑक्टोबर २००७
३.आपले पत्र क्र. जिप/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/४/०९. दिनांक ७/१/२००९

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ क्र.३ चे पत्र कृपया पहावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमासाठी सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापी संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु नकरता सदरची शाळा सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.३ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र. २ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२००८ पासून इ. १ ली च्या वर्गास शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर **कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्यात येत आहे. इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १ | के.विठ्ठलराव बेलदरे पाटील ज्ञान प्रसारक संस्था,प्रा.विद्यालय,आंबेगाव बु.ता.हवेली,जि.पुणे | आंबेगाव बु.ता.हवेली,जि.पुणे | पहिली | मराठी | जून २००८ पासून |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सूयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तीशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ या पत्रान्वये नूतनीकरणाने शाळा परवानगी देवूनही शाळा सुरु न केल्यास भविष्यात सदर शाळेस कोणत्याही कारणास्तव नूतनीकरणाने नरवानगी दिल जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी ती संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तदनंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

(कु-हाडे एस.जे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.करिता

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१ मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२ मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३ शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,--------- यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४ मा. सचिव/अध्यक्ष,
कै.विठ्ठलराव बेलदरे पाटील ज्ञान प्रसारक संस्था,प्रा.विद्यालय,आंबेगाव बु.ता.हवेली,जि.पुणे